राज्य सुरक्षा दलातील "फोर्स वन" पथकाचे प्रशासकीय व कार्यकारी नियंत्रण दहशतवाद विरोधी पथक (ATS), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सोपविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएसए-०७२६/ई.सं.क्र.९८२५१६६/विशा-४
मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: १६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा:-

१) शासन निर्णय क्र.एसएसए-१०/०३/१५/विशा-४, दिनांक ०८.०७.२००४.
२) शासन निर्णय क्र.एसएसए-१००९/प्र.क्र.८४/विशा-४, दिनांक ०२.०४.२००९.
३) क्र.पोमसं/२६-ब/द.वि.पथक/फोर्स वन पथक/१७/२०२४, दि.२४.०२.२०२६.

प्रस्तावना :

दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करणे, त्याबाबत गोपनीय माहितीचे संकलन व विश्लेषण करणे, दहशतवादी संघटना व त्यांच्या सदस्यांविरुद्ध प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करणे तसेच दहशतवादाशी संबंधित गुन्ह्यांचा तपास करणे या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात दहशतवाद विरोधी पथक (Anti Terrorism Squad - ATS) स्थापन करण्यात आले आहे.

तसेच, दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अशा स्वरूपाच्या उच्च जोखमीच्या दहशतवादी घटनांना तात्काळ, समन्वित व प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रसज्ज व विशेष प्रशिक्षणप्राप्त कमांडो दल म्हणून "फोर्स वन" पथकाची स्थापना करण्यात आली. सदर पथकावर दहशतवादी हल्ल्यांना प्रतिकार करणे, ओलीसांची सुटका करणे, महत्त्वाच्या आस्थापनांचे संरक्षण करणे तसेच विशेष दहशतवादविरोधी कारवाया पार पाडण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक एसएसए-१००९/प्र.क्र.३६३ (पुनर्बांधणी क्र.१०५/२०१७)/विशा-४, दिनांक २७ जून, २००९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी दहशतवाद विरोधी पथक प्रमुखांनी फोर्स वन पथकास पाचारण करून संपूर्ण कारवाईचे समन्वयन करावयाचे आहे. तसेच दहशतवाद विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, क्षमता विकास, आधुनिक साधनसामग्री व विशेष कौशल्यवृद्धीबाबतही दहशतवाद विरोधी पथक प्रमुखांकडे महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत.

दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करणे, गुप्त माहितीचे संकलन व विश्लेषण, दहशतवादाच्या अनुषंगाने रेडिकलायझेशन व डिरॅडिकलायझेशनसंदर्भातील उपाययोजना, दहशतवादी हल्ल्यांना तात्काळ प्रतिसाद देणे, ओलीसांची सुटका, दहशतवादाशी संबंधित गुन्ह्यांची नोंद व तपास, तसेच अशा कारवायांचे नियोजन व अंमलबजावणी या सर्व बाबी परस्परपूरक व अविभाज्य स्वरूपाच्या आहेत.

दहशतवादी घटनांमध्ये प्रभावी प्रतिसादासाठी एकसंध नेतृत्व (Unity of Command), एकात्मिक नियोजन (Integrated Planning), जलद निर्णयप्रक्रिया (Rapid Decision Making), प्रभावी संसाधन व्यवस्थापन (Optimal Resource Utilisation) आणि स्पष्ट उत्तरदायित्व (Single Point Accountability) ही तत्त्वे अत्यंत आवश्यक आहेत.

सद्यस्थितीत दहशतवाद विरोधी पथक व फोर्स वन या दोन्ही विशेष पथकांचे प्रशासकीय नियंत्रण स्वतंत्र वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे असल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात एकात्मिक नेतृत्व व समन्वय साधण्यात व्यावहारिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे राज्यातील दहशतवादविरोधी यंत्रणा अधिक सक्षम, गतिमान, समन्वित व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने "फोर्स वन" पथकाचे प्रशासकीय व कार्यकारी नियंत्रण दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली देणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:</u>

दहशतवाद विरोधी पथक व फोर्स वन या दोन्ही विशेष पथकांच्या स्थापनेमागील उद्देश, कार्यक्षेत्र व जबाबदाऱ्या या परस्परपूरक व एकमेकांशी अभिन्न स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे दहशतवादविरोधी कारवायांमध्ये प्रभावी समन्वय, एकसंध नेतृत्व, जलद निर्णयप्रक्रिया, संसाधनांचा कार्यक्षम वापर व परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने राज्य सुरक्षा दलातील "फोर्स वन" पथकाचे प्रशासकीय व कार्यकारी नियंत्रण यापुढे दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राहील.

या शासन निर्णयामुळे फोर्स वन पथकाची विद्यमान पदसंरचना, मनुष्यबळ, आर्थिक तरतूद, सेवा अटी व इतर बाबींमध्ये कोणताही बदल होणार नाही.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक प्रशासकीय आदेश निर्गमित करून नियंत्रण हस्तांतरणाची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी.
या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते अनुषंगिक आदेश निर्गमित करण्याचे अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१११६१२१७१६११२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANANDA JANARDHAN GORE

Digitally signed by ANANDA JANARDHAN GORE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=AD017D9976B111B6D032141907287 1B1736004C4D73FB32C7B1D9BF8B9C862E8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A8FC2F95AD3D46FE026A29242ABD1F7CC4706C10C8E4F1AB21C360FE8170A11B, cn=ANANDA JANARDHAN GORE
Date: 2026.11.16 12:18:35 +05'30'

(आ. ज. गोरे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

०१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
०२. मा.राज्यमंत्री (गृह) शहरे, यांचे खाजगी सचिव.
०३. मा.राज्यमंत्री (गृह) ग्रामीण, यांचे खाजगी सचिव.

०४. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
०५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक.
०६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
०७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
०८. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक.
०९. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सर्व पोलीस आयुक्त.
१३. सर्व पोलीस अधीक्षक.
१४. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), लेखापरीक्षा, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. निवडनस्ती (विशा-४).